# प्रसिद्धिपत्रक

पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,
बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ, पुणे-४११००६
फोन नं. ०२०-२६६८५०००

जा.क्र./पोउआ/वाह/ /२०२४ पुणे दिनांक – / /२०२४

दि. १२/११/२०२४ रोजी मा.व्हि.व्हि.आय.पी. यांचा पुणे दौरा असल्याने, पुणे शहरातील सर्व वाहतूक विभागांतर्गत वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/ टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर, सर्व वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**मा. व्हि.व्हि.आय.पी. यांचा दि. १२/११/२०२४ रोजी पुणे भेट दौरा आहे. त्या अनुषंगाने दि. १२/११/२०२४ रोजी सकाळी ०६/०० वा. ते २४/०० वा. दरम्यान खालील नमुद रस्त्यावर रस्त्याचे दोन्ही बाजुस सर्व प्रकारच्या वाहनांना नो-पार्किंग करण्यात येत आहे.**

१) गोल्फ क्लब चौक ते आंबेडकर चौक
२) संचेती चौक ते खंडोजीबाबा चौक ( जे.एम. रोड)
३) टिळक चौक ते नाथ पै चौक ( शास्त्री रोड )
४) खंडोजी बाबा चौक ते विरचाफेकर चौक ( एफ.सी. रोड )

पोलीस उप-आयुक्त, वाहतूक, पुणे शहर

(अमोल झेंडे )
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

प्रति,

१) जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

प्रत :- १)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – ३, पुणे शहर.

२) पोलीस निरिक्षक, प्रेसरूम, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर
सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.